**महाराष्ट्र शासन**

क्रमांक-बीएड-४६१४/प्र.क्र.२८/१४/मशि-२,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४० ०३२.
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०१४.

प्रति,
कुलसचिव,
मुंबई विद्यापीठ,
मुंबई.

**विषय:-** बी. एड. अभ्यासक्रम सुरु करण्यास ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.
**नमिता एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर सोसायटी, दादर (प.), मुंबई.**

संदर्भ :- National Council for Teacher's Education, Western Regional Committee, यांचे पत्र क्र.WRC/APP 1586/B.Ed./199th/2014/113289,91,92,94,95,96, दि.२७.१.२०१४

महोदय,

विभागीय संचालक, पश्चिम विभागीय समिती, एन.सी.टी.ई., भोपाळ यांनी त्यांच्या क्र.WRC/APP 1586/B.Ed./199th/2014/113289,91,92,94,95,96, दिनांक २७.१.२०१४ च्या पत्रान्वये नमिता एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर सोसायटी, बोराडपाडा, चरगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे या संस्थेस काही अटींच्या अधीन राहून कायम विनाअनुदान तत्त्वावर अध्यापक महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार, खालील अटींच्या अधीन राहून नमिता एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर सोसायटी संचालित सिध्दार्थ बी.एड कॉलेज इंग्रजी माध्यम, बोराडपाडा, चरगाव, ता.अंबरनाथ, जि.ठाणे यांना सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून १०० विद्यार्थी प्रवेशक्षमतेसह बी.एड अभ्यासक्रम कायम विनाअनुदान तत्त्वावर सुरु करण्यास खालील अटींच्या अधीन राहून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

१) एन.सी.टी.ई., भोपाळ यांच्या मान्यतेच्या पत्राची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.
२) एन.सी.टी.ई च्या नियमाप्रमाणे अभ्यासक्रमाचे विहित दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्नता प्रदान करावी.
३) एन.सी.टी.ई भोपाळ यांनी विहित केलेल्या अटींची पुर्तता करण्यात आल्याबाबतची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.
४) बी.एड अभ्यासक्रमास प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैस-२००१/प्र.क्र.१३३/२००४/का-१, दि.४.७.२००८ च्या क्र.५ मधील तरतुदी विहित केलेल्या अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा क्र.८ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य; पुणे व सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल विभाग, यांनी सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करावी.

उर्मिला जोशी

(उर्मिला जोशी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,
संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पनवेल विभाग, पनवेल, जि. रायगड,
सचिव, नमिता एज्युकेशन अॅन्ड वेल्फेअर सोसायटी, श्री कॉम्प्लेक्स, बिल्डींग नं.५/५०१, जे विंग, सयानी रोड, दादर (प.), मुंबई-४०० ०२५.
निवडनस्ती (मशि-२)